# समिती दर्पण

मार्च – एप्रिल २०२२

**विद्यार्थी साहाय्यक समिती** : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पाहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्चशिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहे. त्यात ७५० विद्यार्थी- विद्यार्थिनींची निवास- भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# समिती आता आयएसओ मानांकित

## अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी स्वीकारले प्रमाणपत्र



**पुणे** : विद्यार्थी साहाय्यक समितीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. समितीला आयएसओ ९००१ : २०15 प्रमाणपत्र मिळाले आहे. समितीचे काम नियोजनबद्ध आणि पारदर्शी आहेच, त्यावर आता आंतरराष्ट्रीय मानांकनाची मोहोर उमटली आहे.

आयएसओ प्रमाणपत्राचे वितरण शुक्रवारी (ता. २२ एप्रिल) झाले. आयएसओचे सर्टिफिकेशन्सचे डॉ. सुरेश माळी यांच्या हस्ते समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी हे प्रमाणपत्र स्वीकारले. श्री. पवार यांनी या यशाबद्दल समितीच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. एखाद्या उत्पादनासाठी आयएसओ मिळविणे, ही गोष्ट सामान्य आहे. पण जेथे सेवा पुरविली जाते, तेथे व्यक्तीनिहाय कामाची पद्धत बदलते. अशावेळी आयएसओचे निकष पाळताना केवळ कामकाजातच नाही, तर मानसिकतेतही बदल आवश्यक असतो. समितीचे विश्वस्त, कर्मचाऱ्यांनी संस्थेला प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर नेण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवत, अथक परिश्रम आणि चिकाटीने अवघ्या चार महिन्यांत हे यश प्राप्त झाले. कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाज सांभाळत आयएसओसाठी आवश्यक प्रशिक्षण घेतले. आवश्यक ते दस्तावेज तयार केले. एप्रिलमध्ये हे मानांकन मिळवायचेच, हे लक्ष्य ठेवत त्यानुसार कृती कार्यक्रम आखून तो यशस्वीही केला. विश्वस्त आणि कर्मचाऱ्यांच्या या कामाचे आयएसओच्या टीमच्या वतीने आयएसओचे कन्सल्टंट सुहास गोळे यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी यांनी केले. आयएसओ मानांकन घेण्यामागची भूमिका समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी मांडली. समितीचे कार्यालय उपसमिती अध्यक्ष मनोज गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन श्रुती साने यांनी केले. आभार अपर्णा बापट-घोडके यांनी मानले.

> एखादे लक्ष्य विशिष्ट वेळेत साध्य करायचे ठरवले, तर त्यासाठी आपण आपल्या क्षमतांचा पूर्ण वापर करून ते साध्य करतो. त्याचे उदाहरण म्हणजे विद्यार्थी साहाय्यक समितीने मिळविलेले आयएसओ मानांकन. यामुळे समितीतील कर्मचारी आणि कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.
> – **प्रतापराव पवार**, अध्यक्ष,
> विद्यार्थी साहाय्यक समिती

> विद्यार्थी साहाय्यक समिती ही आयएसओ मानांकन मिळवलेली पुणे जिल्ह्यातील पहिलीच वसतिगृह साखळी आहे. त्याचप्रमाणे मराठीतून दस्तावेज तयार करणारी ही पहिलीच संस्था आहे.
> – **डॉ. सुरेश माळी**, आयएसओ सर्टिफिकेशन्स

मनोगत

### आयुष्य प्रफुल्लित करण्याचे व्यासपीठ म्हणजे समिती



मी विद्यार्थी साहाय्यक समितीचा विद्यार्थी असून अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिकत आहे. २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त समितीच्या आपटे वसतिगृहात ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला, मी JLPT N5 ही जपानी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झालो असल्याने मला या कार्यक्रमात बोलण्याची संधी मिळाली. यावेळी माझे कौतुकही झाले. त्याबद्दल मी समिती परिवाराचे मनापासून आभार मानतो.

समितीच्या माजी विद्यार्थिनी श्रीमती सुजाता कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मी जपानी भाषा शिकत आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात जपानी भाषा शिकल्यास करिअरसाठी मोठा वाव दिसून येतो. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी जपानी आणि इतर जागतिक भाषा शिकण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. जपानी भाषा शिकायला खूप मनोरंजक असून शिकण्यामध्ये सातत्य बाळगले तर खूप सोपीसुद्धा आहे.

विद्यार्थी दशेत असताना विविध क्षेत्रांतील लोकांशी संपर्क वाढवणे, त्यांच्याकडून ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करणे, गरजेचे वाटते. मला यासाठी समिती आणि समितीतील कार्यकर्ते यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले. समितीमध्ये राहात असताना अंकुश भोसले सरांकडून सिक्स सिग्मा कोर्स तसेच तुषार रंजनकर सरांच्या अल्फा बाईट संस्थेकडून IOT चा कोर्स व कॉम्प्युटर हार्डवेअर, असेंबली अँड ट्रबल शूटिंगची एक दिवसीय कार्यशाळा अशा विविध प्रकारच्या संधी मिळत गेल्या. या व्यतिरिक्त कॉग्निझंटसारख्या नामांकित कंपनीकडून विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व समिती आशीर्वाद वृक्षलागवड या प्रकल्पात मला समन्वयक म्हणून काम करण्यास मिळाले. अत्रेमॅडम आणि अत्रे सरांकडून –I PYTHON for Data Science ची माहिती मिळाली. सुप्रियाताई केळवकर यांच्या प्रयत्नातून व घारपुरे सर यांच्या माध्यमातून समितीच्या विद्यार्थ्यांना मोफत स्पोकन इंग्लिशचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले. गणपुले सरांकडून Resume Preparation आणि Group Discussion ची कार्यशाळा व ज्योती गोगटेमॅडम यांच्याकडून 'मुलाखतीसाठी मानसिक तयारी' यावर मार्गदर्शन मिळाले.

–**मयूर हाडवळे**, विद्यार्थी

# उद्योगाभिमुख मानसिकता विकसित करा

## प्रतापराव पवार यांचे प्रतिपादन; उद्योजकता विकास केंद्राचे उद्घाटन

'विद्यार्थ्यांनी उद्योगाभिमुख मानसिकता विकसित केली पाहिजे. अपयश आले तरी पुन्हा जोमाने व्यावसायिक वाटचाल करण्याची जिद्द ठेवली पाहिजे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक, विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी केले.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने उभारण्यात आलेल्या उद्योजकता विकास केंद्राचे उद्घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या प्रायोगिक व्यवसायांचे सादरीकरण तसेच प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी तुषार रंजनकर यांनी उद्योजकता विकास केंद्राची कल्पना, त्याचे स्वरुप व भविष्यातील वाटचाल याविषयी माहिती दिली. समितीत राहून शिक्षण घेतल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू केलेले नवनाथ जगताप आणि सुधीर गंगावणे या नवउद्योजकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




### धुळवडीला अनुभवला उद्योजकतेचा 'रंग'



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कमवा- शिका उपक्रमात होम ट्युशनचे एक हजार रुपये मला १७ मार्च रोजी मिळाले. मित्राला हितेशला म्हणालो, उद्या या हजाराचे डबल करायचे. तू गावाकडे फुले विकली आहेत ना, मग इथे रंग विकू.

सायंकाळी आम्ही रविवार पेठेत गेलो. तेथे होलसेल भावात रंग खरेदी केले. बरोबर आदेश, स्वप्निल होते. प्रतीक आणि पवनला बरोबर घेत रात्रीच रंगांच्या छोट्या पुड्या बांधल्या. दीपकने 'उद्योजकता विकास केंद्रा'च्या बोर्डसाठी मजकूर तयार करून दिला. हितेशने त्याच्या सुंदर अक्षरात बोर्ड तयार केला.

दुसरा दिवस उगवला धुळवडीचा. फर्ग्युसन रोडवर पोचलो. रंगांच्या पुड्या मांडल्या. विद्यार्थी साहाय्यक समितीचा मागचा बोर्ड पाठबळ देत होता. गळ्यात फर्ग्युसन कॉलेजचं आयकार्ड होतं. बघता बघता मित्र, अनोळखी लोकांनी गराडा घातला. तीन तासांत सर्व रंग संपले. स्वप्निल आणि आदेशने पुन्हा जाऊन नवे रंग आणले. आम्ही एकूण सहा हजार रुपयांची विक्री केली. यातून उद्योजकतेचा मोठा धडा मिळाला. तुषार रंजनकर सरांच्या शब्दांत सांगायचे, तर हा फरक असतो, डोकं लावून लीड करण्यात आणि नुसत्या पाट्या टाकण्यात...

**महेश मोहन सांगळे**, उद्योजकता विकास केंद्र प्रमुख

समिती वृत्त

## वसतिगृहे गजबजली

तब्बल दोन वर्षांच्या कोरोना काळानंतर गेल्या महिन्यापासून विद्यार्थी साहाय्यक समितीची वसतिगृहे पुन्हा गजबजली आहेत. सर्व वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यंदा प्रथमच ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व पैसे वाचले. शिवाय प्रवेश प्रक्रियाही सुलभ झाली.

**१५ एप्रिलपर्यंत एकूण प्रवेशित विद्यार्थी**
**डॉ. आपटे वसतिगृह** – १४९
**सुमित्रा सदन** – ११७
**लजपतराय विद्यार्थी भवन** – ११६
**पी.डी. कारखानीस वसतिगृह** – १७०
**नवीन लजपत भवन** – १०१
**एकूण** – ६५३

## विज्ञान दिनी प्रश्नमंजूषा

विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय विद्यार्थी भवनमध्ये प्रश्नमंजूषा व पोस्टर सादरीकरणाचा कार्यक्रम झाला.
प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय चाकणे उपस्थित होते. समितीच्या कार्यकर्त्या सीमा होस्कोटे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तुषार रंजनकर होते. लजपत भवनच्या सर्व पर्यवेक्षकांनीही मार्गदर्शन केले.

**प्रश्नमंजुषा स्पर्धेचा निकाल –**
**प्रथम** – साक्षी गढेकर
**द्वितीय** – विवेक इंगळे
**तृतीय** – वैभव जाधव
**पोस्टर सादरीकरण स्पर्धा निकाल –**
**प्रथम** – साक्षी गढेकर
**द्वितीय** – सुरभी दुनेदर
**तृतीय** – वैष्णवी पवार

## ग्रंथालय नूतनीकरण

डॉ. आपटे वसतिगृहातील ग्रंथालयातील पुस्तकांची विभागणी व नोंदणीचे काम पूर्ण झाले असून, ग्रंथालयाच्या अंतर्गत रचनेच्या नूतनीकरणाचे काम सुरू झाले आहे. सुमित्रा सदनमधील ग्रंथालयातील पुस्तकांची विभागणी व नोंदणीचे काम पूर्ण झाले आहे.



## रमाकांत तांबोळी यांना जीवनगौरव


जळगाव येथील दीपस्तंभसंस्थेतर्फे विद्यार्थी साहाय्यक समितीचे विश्वस्त रमाकांत तांबोळी यांना अनाथ व वंचितांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याबद्दल 'दीपस्तंभ जीवनगौरव' पुरस्काराने नुकतेच गौरवण्यात आले. या सोहळ्यास राज्यसभा खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे, अभिनेते सचिन खेडेकर, कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, उद्योजक दीपक शहा, डॉ. रेखा महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.
रमाकांत तांबोळी नवरंगे बालकाश्रम (पंढरपूर), रिमांड होम (नगर, बारामती), विद्यार्थी सहायक समिती (पुणे), स्नेहालय (नगर), समवेदना (पुणे) आदी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून गेली ६४ वर्षे कार्यरत आहेत. 'दीपस्तंभ'चे संस्थापक यजुवेंद्र महाजन यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली.

शिंपल्यातील मोती

# समितीमुळेच उलगडले आयुष्याच्या गणिताचे सूत्र!!

मी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात सन २००९ ते २०१२ या काळात वास्तव्यास होतो. पदवीसाठी प्रवेश घेतलेला आमच्या कुटुंबातील मी पहिला सदस्य..! पुरंदर तालुक्यातील बोपगाव या छोट्याशा गावातून मी पुण्यात शिक्षणासाठी आलो. घरची परिस्थिती जेमतेम, त्यामुळं इंजिनिअरिंगला प्रवेश मिळत असतानाही, ॲडमिशनसाठी पुरेसे पैसे नसल्याने मी सर परशुरामभाऊ महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. साठी प्रवेश घेतला.

समितीच्या वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज केला. बारावी सायन्सला ७२ टक्के मार्क असल्यामुळे समितीमध्ये मुलाखतीसाठी बोलवले. गणित विषयाला अजिबात मरण नाही, असं कुठंतरी ऐकल्यामुळं व हाच विषय आपला पोटापाण्याचा प्रश्न सोडवू शकतो, असा ठाम विश्वास असल्यानं त्यामध्ये करिअर करायचं मी ठरवलेलं. हे मुलाखतीमध्ये प्रामाणिकपणे सांगितलं आणि समितीत प्रवेश मिळाला.



पहिल्या वर्षी मला सुमित्रा सदन वसतिगृह मिळाले. समितीतील आमचा दिनक्रम ठरलेला असायचा. सकाळी साडेपाचला योगा करण्यापासून तो सुरू व्हायचा. त्यामुळे व्यायामाची सवय लागली, जी आजही कायम आहे. आम्ही सर्व विद्यार्थी समितीतील स्वच्छतेची कामे वाटून घ्यायचो, यामुळे स्वावलंबनाची सवय लागली. 'कमवा व शिका' उपक्रमांतर्गत मी शिकवण्या घेणे, लाईट बिल वाटणे अशी कामे करायचो, ज्यामुळे कष्टाची किंमत कळाली. यातून मिळणाऱ्या रकमेतून मी जेवणाचा व इतर मासिक खर्च भागवायचो. समितीत असताना मी सहाय्य संकलनाचे कामही केले. ज्यामुळे मला समितीच्या पुण्यातील देणगीदारांना भेटता आले. त्यांच्याशी संवाद साधता आल्यामुळे माझ्या व्यक्तिमत्वास वेगळे पैलू पडू लागले.

लजपत भवनमध्ये लायब्ररीशेजारील रूममध्ये मी राहायचो. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत अभ्यास करायची सवय लागली. पदवीच्या दुसऱ्या वर्षाला मला ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले. पदवीच्या तिसऱ्या वर्षी जेव्हा मी आय.आय.टी.च्या परीक्षेची तयारी केली, तेव्हा समितीतील मित्र संजय काळे याने खूप मदत केली. स्वप्नातही विचार केला नव्हता इतकी चांगली रँक मिळवून मी आय.आय.टी.– जे.ए.एम. (जॅम) परीक्षा २०१२ मध्ये उत्तीर्ण झालो. मला ाल इंडिया रँक– ९५ मिळाला व आय.आय.टी. मद्रास येथे गणितात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी प्रवेश मिळाला. हे फक्त समितीचे पाठबळ आणि संस्कारांमुळेच घडू शकले.

पुढे गणित विषयासाठी कठीण मानली जाणारी नेट एक्झाम मी संपूर्ण भारतातून सत्तराव्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो. मला ज्युनिअर रिसर्च फेलोशिप मिळाली. २०१९ मध्ये आय.आय.एस.ई.आर. मोहाली या संस्थेतून गणितामध्ये पी.एच.डी. मिळाली. गणितामध्ये संशोधन करत असताना मला वार्विक विद्यापीठ, लंडन व आय.एच.ई.एस. पॅरिस येथे कॉन्फरन्ससाठी आमंत्रित करण्यात आले. २०२१ मध्ये मला गणित विषयासाठी भारतामध्ये अत्यंत प्रतिष्ठित समजली जाणारी एन.बी.एच.एम. पोस्टडॉक फेलोशिप व डॉ. के. व्ही. राव. सायन्टिफीक सोसायटीमार्फत दिला जाणारा रिसर्च वार्ड मिळाला. सध्या मी आय.आय.एस.ई.आर. पुणे येथे पोस्टडॉक करत आहे.

हे जे काही मर्यादित यश मी मिळवू शकलो, यात समितीचा खूप मोठा वाटा आहे, असं मी मानतो. माझ्याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे समीकरण समितीमुळे नक्कीच बदलले असणार.

**डॉ.सागर काळाणे,**
माजी विद्यार्थी (२००९ – २०१२)

# शिक्षण आयुक्तांनी दिला यशाचा मंत्र

'नुसती डीग्री पाहून कोणी नोकरी देत नाही, त्यासाठी पुन्हा नवीन काहीतरी शिकावे लागते. शिकणे ही निरंतन प्रक्रिया आहे,' असे प्रतिपादन तत्कालीन शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी केले.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात झालेल्या कार्यक्रमात विशाल सोळंकी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना यशाचा मंत्र दिला. यावेळी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, कार्यकर्ते, पर्यवेक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

'भविष्यातील संधी आणि बदल समजून घेऊन स्वतःला घडवा, स्वतः विचार करण्याची क्षमता निर्माण करा,' असा सल्ला सोळंकी यांनी विद्यार्थ्यांना दिला. ते म्हणाले, 'विविध क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने समितीतील विद्यार्थ्यांचा विकास होत आहे. समितीचे संस्कार अंगी बाणवून जेव्हा तुम्ही एखाद्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्याल, तेव्हाच तुम्ही समितीचे माजी विद्यार्थी म्हणून ओळखले जाल.'

व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना सोळंकी यांनी उत्तरे दिली. कार्यक्रमाची सुरुवात प्राजक्ता चव्हाण हिच्या स्वागत गीताने झाली. यावेळी सल्लागार डॉ. सिद्धेश वाडकर उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश सांगळे याने केले. वैष्णवी उबाळे हिने आभार मानले.



> समितीचा विद्यार्थी जीवनात यशस्वी होतोच. येथील संस्कार लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी समितीची कार्यपद्धती राज्यभर राबविण्याचा प्रयत्न आहे.
> – **विशाल सोळंकी**



## वैद्य हरीश पाटणकर यांचा पंतप्रधानांच्या हस्ते सन्मान

**पुणे :** केंद्रीय आयुष मंत्रालयातर्फे आयोजित 'स्टार्टअप चॅलेंज' या राष्ट्रीय स्पर्धेत पुण्यातील वैद्य हरीश पाटणकर व डॉ. प्रिया गोखले यांना प्रथम पारितोषिक मिळाले. पाटणकर हे विद्यार्थी साहाय्यक समितीचे माजी विद्यार्थी आहेत.

'आयुष' विभागातील नवीन संशोधनांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजिलेल्या 'ग्लोबल आयुष इनवेस्टमेंट्स अँड इनोव्हेशन समिट २०२२' या परिषदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गुजरातमधील गांधीनगर येथे झालेल्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद जगनौथ, जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक डॉ. टेड्रोस अधानोम उपस्थित होते.

'केशायुर्वेद'चे संस्थापक वैद्य हरीश पाटणकर यांनी डॉ. प्रिया गोखले यांच्यासह जेएसपीएम संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या समन्वयाने केलेल्या 'पंचकर्मातील स्वेदन पेटीमधील तापमान नियंत्रक' (Temperature Regulator in Steam Chamber used in Panchakarma Theatre) या संशोधनासाठी हे पारितोषिक मिळाले आहे. या संशोधनामुळे आयुर्वेदातील पंचकर्म चिकित्सेत स्वेदन या कर्मासाठी शास्त्रीय पद्धतीने तापमान नियंत्रण करता येणार आहे.

# नव्या विद्यार्थ्यांना रुळविणारी परिचय सभा



विद्यार्थी साहाय्यक समिती ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फक्त निवास व भोजनाची व्यवस्था पुरवणारी नाही, तर त्यांचा सर्वांगिण विकास घडवणारी संस्था म्हणून ओळखली जाते. कोरोनाकाळानंतर शिक्षण क्षेत्र नव्याने सुरू झाले आणि ग्रामीण विद्यार्थ्यांनी समितीची वसतिगृहे पुन्हा गजबजली.

समितीत नव्याने प्रवेश घेतलेला ग्रामीण विद्यार्थी शहरी वातावरणामुळे थोडा बुजतो. त्याला समितीची माहिती व्हावी, त्याचा समितीतील अन्य विद्यार्थ्यांशी संवाद व्हावा, यासाठी परिचय सभेचे आयोजन केले जाते. या सभेचे वैशिष्ट्य असे की, समितीतील जुने विद्यार्थीच या नव्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी या सभेचे आयोजन करतात.

यंदाची परिचय सभा १२ मार्च रोजी डॉ. आपटे वसतिगृहात झाली. समितीचे सर्व कार्यकर्ते, पर्यवेक्षक तसेच विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

यावेळी नवीन विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. समितीची मूल्ये, धोरणे, नियमने, व्यवस्थापन, कार्यकर्ते, पर्यवेक्षक व समितीच्या बारा उपसमित्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. आम्ही समितीमध्ये कसे घडलो, याविषयी अनुभव ज्येष्ठ आजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अनुभव सांगितले.

समितीचे वेगळेपण ठरलेले विद्यार्थी व्यवस्थापन आणि विद्यार्थी विकास केंद्र या संदर्भात माहिती तुषार रंजनकर यांनी दिली. समितीच्या ज्येष्ठ पर्यवेक्षिका श्रीमती गारवे यांनी स्वच्छता, स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा या त्रिसुत्रीवर भाष्य केले. समितीच्या सर्व उपक्रमांत सहभागी व्हा व आपण ज्या ध्येयासाठी पुणे शहरात आलो आहोत, त्यावर लक्ष केंद्रित करा, असा सल्ला पर्यवेक्षक सचिन मोकाशे यांनी दिला. विनया ठोंबरे यांनी कमवा– शिका योजना व दिनकर वैद्य यांनी समितीचे विद्यार्थी मासिक अवलोकन याविषयी माहिती दिली.

> ग्रामीण भागातून येणे, हा तुमच्या जीवनात यशस्वितेसाठी मारक घटक नाही. येथून समितीच्या संस्काराची शिदोरी घेऊन बाहेर पडा. सर्वेक्षणानुसार समितीचा एकही विद्यार्थी जीवनात अयशस्वी नाही. तुम्हीही आयुष्यात मोठी बाजी माराल.
> – **तुकाराम गायकवाड,** कार्यकारी विश्वस्त

**भागवत ससाणे,**
विद्यार्थी विकास केंद्र प्रमुख, लजपत संकुल

## समितीतील सभागृहांचा लाभ घेणे शक्य

विद्यार्थी साहाय्यक समितीची पुण्यात तीन ठिकाणी वसतिगृहे असून तेथे सभागृह, बैठकीसाठी खोल्या, गेस्ट रूम उपलब्ध आहेत.

- **डॉ. अच्युत शंकर आपटे** वसतिगृहात (फर्ग्युसन रस्ता, हॉटेल ललित महल चौक, एच.डी.एफ.सी. बँकेच्या मागे, संपर्क– ०२०– २५५३३६३१, ९४०४८५५५३०) १०० लोकांच्या क्षमतेचे डॉ. मोडक सभागृह, तर ३० ते ३५ जणांची बैठक व्यवस्था असलेले वातानूकुलित सुमनताई करंदीकर सभागृह आहे. याशिवाय दोन गेस्ट रूम असून त्या वातानूकुलित आहेत.
- **लजपतराय विद्यार्थी भवन** येथे (शिवाजी हाउसिंग सोसायटीजवळ, सेनापती बापट रस्ता, संपर्क– ०२०– २५६३९३३०) ५० ते ६० लोकांच्या क्षमतेचे पुसाळकर सभागृह तसेच २० ते २५ जणांची बैठकव्यवस्था असलेले माजी विद्यार्थी सभागृह आहे. याशिवाय एक गेस्ट रुम आहे.
- **सुमित्रा सदन** वसतिगृहात (मॉडेल कॉलनी, पोलिस मैदानासमोर, संपर्क– ०२०– २५६५५२१५) ४० क्षमतेचे एक सभागृह आहे.

सभागृह वापरण्यास देण्यामागे संस्थेचा व्यावसायिक हेतू नाही. सामाजिक उपक्रम, पुस्तक प्रकाशन, व्याख्यान अशा कार्यक्रमांसाठी सभागृह उपलब्ध असेल.